**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/236
Peer Reviewed & Refereed Journal, JULY-AUG 2024, Vol- 13/84

# भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ चे बदलते स्वरूप : एक चिकित्सक अभ्यास

**ॲड. कृष्णा अवधुत काजळे**
पीएच. डी. संशोधक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**Paper Received On**: 20 July 2024
**Peer Reviewed On:** 24 August 2024
**Published On:** 01 September 2024

## प्रस्तावना:-

'भारताचे संविधान' हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मूलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये दर्शवतो. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे तसेच नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडलेली आहे. हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. भारतीय राज्यघटना ही संवैधानिक वर्चस्व प्रदान करते. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना विविध मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत. या मूलभूत अधिकारांमध्ये अनुच्छेद २१ ला भारतीय संविधानाचा आत्मा म्हटले जाते. या अनुच्छेद २१ मध्ये अशी तरतूद आहे की, 'कायद्याने स्थापित प्रक्रियेव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला तिच्या जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित करता येणार नाही.' प्रारंभी या अनुच्छेदाचा अर्थ अत्यंत मर्यादित स्वरूपात घेतला गेला होता; परंतु काळाच्या ओघात भारतीय न्यायपालिकेने या अनुच्छेदाची व्यापक व्याख्या केली आणि त्यामध्ये अनेक मानवी हक्कांचा समावेश केला.

मानवी जीवन केवळ शारीरिक अस्तित्वापुरते मर्यादित नसून सन्मान, सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, स्वच्छ पर्यावरण, गोपनीयता, उपजीविका आणि मानवी प्रतिष्ठा यासारख्या अनेक घटकांशी निगडित आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने विविध न्यायालयीन निर्णयांद्वारे अनुच्छेद २१ च्या कक्षेत या सर्व घटकांचा समावेश करून 'जीवनाचा अधिकार' अधिक व्यापक आणि गतिशील बनविला आहे. अनुच्छेद २१ हा केवळ शारीरिक अस्तित्वापुरता मर्यादित नसून सन्मानाने जगण्याचा अधिकार, आरोग्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार, गोपनीयतेचा अधिकार, विधी सहाय्याचा अधिकार, अन्नाचा अधिकार, निवाऱ्याचा अधिकार यासारख्या

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अनेक अधिकारांचा आधारस्तंभ बनला आहे. विशेषतः सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध ऐतिहासिक निर्णयांमुळे अनुच्छेद २१ चे स्वरूप सतत विकसित होत गेले आहे. आजच्या जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञान आणि डिजिटल युगामध्ये मानवी जीवनाच्या स्वरूपात मोठे बदल घडत आहेत. या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीत अनुच्छेद २१ च्या व्याख्येमध्येही परिवर्तन होत आहे. त्यामुळे अनुच्छेद २१ च्या बदलत्या स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**अनुच्छेद २१ ची संकल्पना आणि घटनात्मक पार्श्वभूमी:-**

भारतीय संविधान निर्मात्यांनी नागरिकांच्या जीवन आणि स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी अनुच्छेद २१ ची तरतूद केली. व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे मात्र हे स्वांतत्र्य इतरांच्या हक्कांवर परिणाम होणार नाही अशा मर्यादेतच आहे. या कलमाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे कलम संविधानापेक्षा न्यायालयीन निर्णयांमधून आकारास आले आहे. या कलमाची व्याप्ती व सुस्पष्टता वाढविण्यासाठी न्यायालयाने मोठा हातभार लावला आहे. या अनुच्छेदावर अमेरिकन संविधानातील 'Due Process of Law' आणि ब्रिटिश न्यायव्यवस्थेतील 'कायद्याचे राज्य' या संकल्पनांचा प्रभाव दिसून येतो. तथापि, भारतीय संविधानात 'Procedure Established by Law' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला.

अनुच्छेद २१ चे मूळ उद्दिष्ट राज्यसत्तेच्या मनमानी हस्तक्षेपापासून व्यक्तीच्या जीवन आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हे होते. संविधान सभेतील चर्चांमध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण हा महत्त्वाचा विषय होता. संविधान निर्मात्यांनी व्यक्तीच्या प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवून या अनुच्छेदाची रचना केली. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये अनुच्छेद २१ हा सर्वाधिक व्यापक आणि गतिशील अनुच्छेद म्हणून विकसित झाला आहे. प्रारंभीच्या काळात या अनुच्छेदाचा अर्थ मर्यादित होता; परंतु न्यायालयीन सक्रियतेमुळे त्याचा विस्तार झाला.

**अनुच्छेद २१ ची प्रारंभीची व्याख्या:-**

अनुच्छेद २१ च्या प्रारंभीच्या व्याख्येमध्ये न्यायालयाने अत्यंत संकुचित दृष्टिकोन स्वीकारला होता. A.K. Gopalan v. State of Madras या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'Procedure Established by Law' या शब्दांचा कठोर आणि तांत्रिक अर्थ घेतला. न्यायालयाने असे स्पष्ट केले की संसदेमार्फत तयार केलेला कोणताही कायदा वैध असेल तर त्या कायद्याच्या आधारे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आणता येतील. या निर्णयामुळे राज्याला व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवण्याचा अधिकार प्राप्त झाला. न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा विचार केला नाही.

त्यामुळे अनुच्छेद २१ चा उपयोग अत्यंत मर्यादित राहिला. प्रारंभीच्या काळात अनुच्छेद २१ हा केवळ शारीरिक स्वातंत्र्याशी संबंधित अधिकार मानला जात होता. जीवनाच्या गुणवत्तेचा, मानवी प्रतिष्ठेचा किंवा सामाजिक न्यायाचा विचार या अनुच्छेदाच्या व्याख्येमध्ये केला जात नव्हता.

**अनुच्छेद २१ च्या व्याख्येतील परिवर्तनः-**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ हा जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा मूलभूत अधिकार मानला जातो. प्रारंभी या अनुच्छेदाची व्याख्या केवळ कायदेशीर प्रक्रियेपुरती मर्यादित होती; परंतु बदलत्या सामाजिक, राजकीय आणि न्यायिक परिस्थितीनुसार त्यामध्ये व्यापक परिवर्तन घडून आले. भारतीय न्यायपालिकेने विशेषतः सर्वोच्च न्यायालयाच्या विविध ऐतिहासिक निर्णयांद्वारे अनुच्छेद २१ ला अधिक मानवकेंद्री, उदारमतवादी आणि गतिशील स्वरूप प्रदान केले. परिणामी, जीवनाचा अधिकार हा केवळ अस्तित्वाचा अधिकार न राहता सन्मान, प्रतिष्ठा, आरोग्य, शिक्षण, गोपनीयता आणि स्वच्छ पर्यावरण यांसारख्या अनेक अधिकारांचा आधार बनला.

भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये १९७० नंतर मोठे परिवर्तन झाले. न्यायालयाने संविधानाचा उदारमतवादी आणि मानवकेंद्री दृष्टिकोन स्वीकारण्यास सुरुवात केली. विशेषतः मेनका गांधी विरूध्द भारत सरकार या प्रकरणाने अनुच्छेद २१ च्या इतिहासात महत्त्वपूर्ण टप्पा निर्माण केला. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'Procedure Established by Law' ही प्रक्रिया न्याय्य, वाजवी आणि निष्पक्ष असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ अंतर्गत समानतेचा अधिकार, अनुच्छेद १९ अंतर्गत स्वातंत्र्याचा अधिकार आणि अनुच्छेद २१ अंतर्गत जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार हे परस्पर संबंधित, परस्परपूरक आणि एकमेकांशी अभिन्नपणे जोडलेले आहेत. हे मूलभूत अधिकार एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे मानता येणार नाहीत. या निर्णयामुळे अनुच्छेद २१ ची व्याप्ती अत्यंत व्यापक झाली. या निर्णयानंतर अनुच्छेद २१ अंतर्गत अनेक नवीन अधिकारांचा समावेश करण्यात आला. जीवनाचा अधिकार हा केवळ शारीरिक अस्तित्वापुरता मर्यादित नसून व्यक्तीला सन्मानाने, सुरक्षिततेने आणि मानवी प्रतिष्ठेसह जीवन जगण्याचा अधिकार आहे, अशी व्यापक व्याख्या न्यायालयाने स्वीकारली. परिणामी मानवी प्रतिष्ठेशी संबंधित अनेक अधिकार अनुच्छेद २१ अंतर्गत समाविष्ट करण्यात आले.

**अनुच्छेद २१ अंतर्गत विकसित झालेले अधिकारः-**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या अनेक अधिकारांचा अनुच्छेद २१ अंतर्गत समावेश करण्यात आला आहे. सन्मानाने जगण्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार, स्वच्छ

पर्यावरणाचा अधिकार, गोपनीयतेचा अधिकार आणि विधी सहाय्याचा अधिकार यासारखे विविध अधिकार न्यायालयीन व्याख्यांद्वारे विकसित झाले आहेत. या अधिकारांमुळे अनुच्छेद २१ हा भारतीय संविधानातील सर्वाधिक गतिशील, व्यापक आणि मानवकेंद्री मूलभूत अधिकार म्हणून विकसित झाला आहे. त्यामुळे अनुच्छेद २१ अंतर्गत विकसित झालेल्या अधिकारांचा अभ्यास भारतीय लोकशाही, मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**१. सन्मानाने जगण्याचा अधिकार:-**

सन्मानाने जगण्याचा अधिकार हा अनुच्छेद २१ चा मुख्य आधार बनला आहे. व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. गरिबी, शोषण, अमानवीय वागणूक आणि सामाजिक अन्याय यांपासून व्यक्तीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार हा मानवाच्या अस्तित्वाशी, प्रतिष्ठेशी आणि सर्वांगीण विकासाशी निगडित असलेला सर्वात महत्त्वपूर्ण मूलभूत मानवाधिकार मानला जातो. व्यक्तीचे इतर सर्व अधिकार हे जीवनाच्या अधिकाराभोवती केंद्रीत असतात. म्हणूनच, या अधिकाराचा अभ्यास सामाजिक, कायदेविषयक आणि घटनात्मक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा ठरतो. सर्व मानवाधिकारांमध्ये ‘जीवन जगण्याचा अधिकार’ हा सर्वाधिक मूलभूत आणि सार्वत्रिक अधिकार मानला गेला आहे. भारतीय संविधानाच्या भाग III मध्ये समाविष्ट असलेल्या मूलभूत अधिकारांमध्येही संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत प्रदान करण्यात आलेला ‘जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार’ हा अत्यंत व्यापक, गतिशील आणि सर्वोच्च स्वरूपाचा अधिकार मानला जातो. काळानुरूप न्यायालयीन व्याख्यांमुळे या अनुच्छेदाची व्याप्ती सतत विस्तारत गेली असून मानवी प्रतिष्ठा, सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार, गोपनीयता, आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छ पर्यावरण यांसारख्या अनेक अधिकारांचा त्यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**२. शिक्षणाचा अधिकार:-**

शिक्षण हा व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक विकासाचा मूलभूत आधार मानला जातो. लोकशाही व्यवस्थेमध्ये शिक्षणाला सामाजिक परिवर्तन, समानता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले जाते. भारतीय संविधानामध्ये सुरुवातीला शिक्षणाचा अधिकार हा राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये समाविष्ट करण्यात आला होता; तथापि, कालांतराने शिक्षणाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन न्यायपालिकेने त्याला जीवनाच्या अधिकाराशी जोडले.

Unnikrishnan J.P. v. State of Andhra Pradesh या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा अधिकार हा अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे

घोषित केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, सन्मानाने जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे आणि शिक्षणाशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास शक्य नाही. त्यामुळे राज्यावर नागरिकांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची घटनात्मक जबाबदारी आहे. या निर्णयामुळे शिक्षणाच्या अधिकाराला संविधानिक संरक्षण प्राप्त झाले आणि शिक्षण हे केवळ कल्याणकारी धोरण न राहता मूलभूत अधिकाराच्या स्वरूपात विकसित झाले. पुढे संविधानामध्ये ८६ वी घटनादुरुस्ती करून अनुच्छेद २१-अ (21A) समाविष्ट करण्यात आला. या घटनादुरुस्तीनुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य ठरविण्यात आले व शिक्षणाचा अधिकार स्वतंत्र मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट करण्यात आला.

**३. आरोग्याचा अधिकार:-**

आरोग्य हा मानवाच्या जीवनाशी, कार्यक्षमतेशी आणि सर्वांगीण विकासाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. निरोगी जीवनाशिवाय व्यक्तीचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीमध्ये प्रभावी योगदान शक्य होत नाही. त्यामुळे आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचा अधिकार हा मानवी प्रतिष्ठा आणि जीवनाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित मानला जातो. भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराची व्यापक व्याख्या करताना सर्वोच्च न्यायालयाने Parmanand Katara v. Union of India या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक नागरिकाला तातडीची वैद्यकीय मदत मिळणे हा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर Paschim Banga Khet Mazdoor Samity v. State of West Bengal या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने तातडीची वैद्यकीय मदत आणि पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे अनुच्छेद २१ अंतर्गत राज्याचे घटनात्मक कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छ पाणी, स्वच्छता आणि वैद्यकीय उपचार यांचा समावेश जीवनाच्या अधिकारामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे आरोग्याचा अधिकार हा मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाशी संबंधित महत्त्वपूर्ण मूलभूत अधिकार मानला जातो.

**४. स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार:-**

औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तांत्रिक विकासामुळे आधुनिक समाजात पर्यावरणीय समस्या मोठ्या प्रमाणात वाढू लागल्या आहेत. वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जंगलतोड आणि औद्योगिक कचरा यासारख्या समस्यांचा मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. निरोगी आणि सुरक्षित पर्यावरणाशिवाय सन्मानपूर्वक जीवन जगणे शक्य नसल्यामुळे पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न मानवी हक्कांशी जोडला गेला आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराची व्यापक व्याख्या करताना सर्वोच्च न्यायालयाने स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार हा

जीवनाच्या अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले. M.C. Mehta v. Union of India व Subhash Kumar v. State of Bihar केसमध्ये न्यायालयाने असे नमूद केले की, स्वच्छ हवा, शुद्ध पिण्याचे पाणी आणि सुरक्षित पर्यावरण हे नागरिकांच्या निरोगी जीवनासाठी अत्यावश्यक घटक आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षण हे राज्याचे घटनात्मक कर्तव्य मानले गेले. भारतीय संविधानातील राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये आणि मूलभूत कर्तव्यांमध्येही पर्यावरण संरक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

**५. गोपनीयतेचा अधिकार:-**

आधुनिक डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये व्यक्तीच्या गोपनीयतेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. इंटरनेट, सोशल मीडिया, मोबाईल तंत्रज्ञान, ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल डेटा संकलन यामुळे व्यक्तीची वैयक्तिक माहिती मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. अशा परिस्थितीत व्यक्तीच्या खासगी आयुष्याचे संरक्षण, वैयक्तिक माहितीची सुरक्षितता आणि वैयक्तिक स्वायत्ततेचे जतन करणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे गोपनीयतेचा अधिकार हा मानवी प्रतिष्ठा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित महत्त्वपूर्ण अधिकार म्हणून उदयास आला. Justice K.S. Puttaswamy v. Union of India या ऐतिहासिक निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार हा अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे घोषित केले. या निर्णयामुळे व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण, डिजिटल डेटा सुरक्षा आणि वैयक्तिक स्वायत्तता यांना संविधानिक संरक्षण प्राप्त झाले.

**६. विधी सहाय्याचा अधिकार:-**

लोकशाही व्यवस्थेमध्ये न्याय मिळविण्याचा अधिकार हा सामाजिक न्याय आणि कायद्यापुढील समानतेचा मूलभूत आधार मानला जातो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरीब आणि वंचित घटकांना न्यायालयीन प्रक्रिया, कायदेशीर प्रतिनिधित्व आणि न्याय मिळविण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध नसल्यास त्यांचे मूलभूत अधिकार प्रभावीपणे संरक्षित होऊ शकत नाहीत. त्यामुळे मोफत विधी सहाय्याचा अधिकार हा न्यायव्यवस्थेतील समानतेच्या तत्त्वाशी संबंधित महत्त्वपूर्ण अधिकार मानला जातो. Hussainara Khatoon v. State of Bihar या महत्त्वपूर्ण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मोफत विधी सहाय्य आणि जलद न्याय मिळणे हे अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणामध्ये दीर्घकाळ खटल्यांची प्रतीक्षा करणाऱ्या कैद्यांच्या परिस्थितीकडे न्यायालयाचे लक्ष वेधले गेले. न्यायालयाने असे नमूद केले की, गरीब व्यक्तींना कायदेशीर मदतीअभावी न्याय नाकारला जाऊ शकत नाही. या निर्णयानंतर गरिब आणि दुर्बल व्यक्तींना मोफत कायदेशीर मदत मिळणे हा देखील अनुच्छेद २१ चा

भाग मानण्यात आला. न्यायप्रवेश सर्वांसाठी समान असणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

**अनुच्छेद २१ चे सामाजिक महत्त्व:-**

भारतीय न्यायपालिकेने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनुच्छेद २१ ची विस्तारित व्याख्या केली आहे. न्यायालयीन सक्रियतेमुळे दुर्बल, गरीब आणि वंचित घटकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात मदत झाली. सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक हित याचिका (PIL) प्रणालीद्वारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दिले आहेत. कारागृहातील कैद्यांचे हक्क, बालमजुरी, स्त्रियांचे संरक्षण, पर्यावरणीय प्रश्न आणि कामगारांचे अधिकार या विषयांवर न्यायालयाने सक्रिय भूमिका घेतली. न्यायालयीन सक्रियतेमुळे संविधानातील मूलभूत अधिकार अधिक प्रभावी बनले.

तथापि, काही विद्वानांच्या मते न्यायालयाने आपल्या अधिकारक्षेत्राचा अतिरेक केला आहे. विधिमंडळ आणि कार्यपालिका यांच्या कार्यामध्ये न्यायपालिकेचा हस्तक्षेप वाढल्याची टीका देखील करण्यात येते. काही विद्वानांच्या मते न्यायालयीन सक्रियता ही लोकशाही मूल्ये आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे; तर काहींच्या मते यामुळे सत्ताविभाजनाच्या तत्त्वाला धोका निर्माण होऊ शकतो. तथापि, भारतीय समाजातील सामाजिक विषमता, गरिबी, दुर्बल घटकांची स्थिती आणि प्रशासनिक त्रुटी लक्षात घेतल्यास अनेक वेळा न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक आणि उपयुक्त ठरतो. या अनुच्छेदाविषयी तज्ज्ञांमध्ये मतभिन्नता असली तरी अनुच्छेद २१ चा वंचित घटकांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी वापर करण्यात आला आहे. त्यामुळे संविधानातील सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक मजबूत झाली आहे.

**सारांश-**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ हा सर्वाधिक गतिशील आणि व्यापक मूलभूत अधिकार म्हणून विकसित झाला आहे. प्रारंभी मर्यादित स्वरूप असलेला हा अनुच्छेद आज मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय आणि जीवनाच्या गुणवत्तेशी संबंधित विविध अधिकारांचा आधार बनला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सक्रियतेमुळे अनुच्छेद २१ ची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, गोपनीयता आणि डिजिटल हक्क यांसारख्या अनेक अधिकारांचा समावेश जीवनाच्या अधिकारामध्ये करण्यात आला आहे. आधुनिक काळातील सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक बदलांमुळे अनुच्छेद २१ चे स्वरूप भविष्यातही विकसित होत राहील. मानवी हक्कांचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी अनुच्छेद २१ अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहील.

**संदर्भसूची-**

*Kanika. (2024). Critical Analysis of Article 21 of the Indian Constitution (Right to Life and Personal Liberty). International Journal of Creative Research Thoughts (IJCRT). Volume 12, Issue 5 May 2024, Pg. No. 295*

*Das Piyasha. (2020).Critical Analysis on Interpretation of Article 21 of the Indian Constitution. International Journal of Law Management & Humanities. Vol. 3 Issue 5, Pg. No. 425*

*Kundu, Indrani. (2020). Constitutionalism to Transformative Constitutionalism: The Changing Role of the Judiciary. Indian Journal of Law and Justice. Vol. 11 No. 2, September-2020, Pg. No. 357*

*People's Union for Civil Liberties v. Union of India, AIR 1997 SC 568 (India).*

*Banga, M. (2021). Legal protection of right to education in India. International Journal of Law Management & Humanities, Vol. 4, Issue-4, Pg. No. 1993 . https://ijlmh.com/wp-content/uploads/Legal-Protection-of-Right-to-Education-in-India.pdf*

*ibid, Pg. No. 1999.*

*Paschim Banga Khet Mazdoor Samity v. State of West Bengal, (1996) 4 SCC 37*

*Kar, Anisha. (2023). Right to Clean Environment: A Constitutional and Legislative Perspective. International Journal of Law Management and Humanities. Vol. 06. Issue- 05. Pg. No. 388.*

*Columbia Global Freedom of Expression. (2017). Puttaswamy v. Union of India (I). retrieved from*
https://globalfreedomofexpression.columbia.edu/cases/puttaswamy-v-india/